# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

**<u>प्रेसनोट</u>**

## <u>पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पर्यटन बस क्र. २ सेवेचा शुभारंभ</u>

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पर्यटन बससेवा क्र. २ चा शुभारंभ रविवार, दिनांक ९ जून २०२४ रोजी स्वारगेट बसस्थानक येथे पुणे महानगर परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते यांच्या हस्ते बसला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यावेळी चीफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) श्री. सतीश गव्हाणे, वाहतूक नियोजन व संचलन अधिकारी श्री. नारायण करडे, स्वारगेट डेपो मॅनेजर श्री. शैलेश नाईक, कर्मचारी व प्रवासी नागरिक उपस्थित होते.

प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी व रविवारी विविध कार्यालये, कॉलेज, शाळा, औद्योगिक क्षेत्रातील व आयटी क्षेत्रातील कंपन्यांमधील नोकरदारांना साप्ताहिक सुट्टी असल्याने प्रवाशांचा प्रवास आरामदायी, सुलभ व माफक दरात होणेच्या दृष्टीने पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पुणे दर्शन बससेवेच्या धर्तीवर गतवर्षी १६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून धार्मिक व पर्यटन स्थळांकरिता वातानुकूलीत ई-बसेसव्दारे विशेष बससेवा प्रत्येक आठवड्याच्या शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दिनांक ०१/०५/२०२३ पासून सुरू करण्यात आलेली आहे. या 'पर्यटन बस' सेवेकारिता प्रति प्रवासी तिकीट दर रूपये ५००/- इतका आकारण्यात येतो.

हडपसर, सासवड सोपानकाका मंदिर, संगमेश्वर मंदिर, नारायणपूर, बालाजी मंदिर (केतकवळे), बनेश्वर मंदिर, कोंढणपूर मंदिर, हडपसर या मार्गावरील ‘पर्यटन बस’ ला महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते व यावेळी उपस्थित प्रवासी नागरिक यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून बस मार्गस्थ केली.

या वेळी बोलताना महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते म्हणाले कि, पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सुरू करण्यात आलेल्या पर्यटन बससेवा क्र. १ (मार्ग - हडपसर, मोरगांव, जेजूरी, सासवड, हडपसर), पर्यटन बससेवा क्र. २ (मार्ग - हडपसर, सासवड सोपानकाका मंदिर, संगमेश्वर मंदिर, नारायणपूर, बालाजी मंदिर (केतकवळे), बनेश्वर मंदिर, कोंढणपूर मंदिर, हडपसर.), पर्यटन बससेवा क्र. ३ (मार्ग - डेक्कन, खारावडे म्हसोबा देवस्थान, टेमघर धरण, निळकंठेश्वर पायथा, डेक्कन), पर्यटन बससेवा क्र. ४ (मार्ग - पुणे स्टेशन, खडकवासला धरण, पानशेत धरण, वरसगांव धरण, पुणे स्टेशन), पर्यटन बससेवा क्र. ५ (मार्ग - पुणे स्टेशन, पुलगेट, हडपसर, रामदरा, थेऊर गणपती, प्रयागधाम, हडपसर, पुणेस्टेशन), पर्यटन बससेवा क्र. ६ (मार्ग - पुणे स्टेशन, वाघेश्वर मंदिर (वाघोली), वाडेबोल्हाई, छ. संभाजी महाराज समाधीमंदिर (वढू बुद्रुक), रांजणगांव गणपती, पुणे स्टेशन), पर्यटन बससेवा क्र. ७

(मार्ग - भक्ती शक्ती निगडी, अप्पूघर, इस्कॉन मंदिर (रावेत), मोरया गोसावी मंदिर (चिंचवड), प्रतिशिर्डी (शिरगांव), देहूगांव, गाथा मंदिर, आळंदी, भक्ती शक्तीनिगडी) या वातानुकूलीत पर्यटन बससेवेचा लाभ भक्तगण, भाविक व पर्यटक यांनी घ्यावा असे ते म्हणाले.

sd/-

**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर** (ऑपरेशन)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. ०९/०६/२०२४.

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-

**कामगार व जनता संपर्क अधिकारी**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---